मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या अर्थसंकल्पाकडे लक्ष

## आर्थिक वर्षात शहराला नवीन प्रकल्प काय मिळणार? नगरसदस्य काय कामे सुचवितात? याकडे लक्ष लागले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेचा अर्थसंकल्प प्रशासनाकडून स्थायी समितीला सादर केला जाणार आहे. चार वर्षांच्या खंडानंतर लोकप्रतिनिधी स्थायी समिती व सर्वसाधारण सभेत त्यावर चर्चा करणार आहेत. त्यामुळे आगामी २०२६-२७ या आर्थिक वर्षात शहराला नवीन प्रकल्प काय मिळणार? नगरसदस्य काय कामे सुचवितात? याकडे लक्ष लागले आहे.

कोविड प्रतिबंधक नियमावली, ओबीसी आरक्षणाचे न्यायप्रविष्ट प्रकरण आणि राज्यातील बदलती राजकीय समीकरणे यामुळे मार्च २०२२ पासून महापालिका निवडणूक लांबणीवर पडली होती. त्यामुळे १३ मार्च २०२२ ते सहा फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राज्य सरकारने आयुक्तांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली होती. सहा तारखेला भाजपने सत्ता स्थापन करून कामकाज सुरू केले आहे. त्यामुळे दरम्यानच्या काळातील २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ या तीन वर्षातील अर्थसंकल्प प्रशासकांनीच मंजूर करून त्याची अंमलबजावणी केली आहे. मात्र, २०२२-२३ चा अर्थसंकल्प फेब्रुवारी २०२२ मध्ये लोकनियुक्त सदस्यांनी मंजूर केला होता. मात्र, त्यांची मुदत संपल्याने प्रशासकांनी अंमलबजावणी केली. आता २०२६-२७ चा अर्थसंकल्प तयार करण्याचे काम जून २०२५ पासून सुरू होते. नागरिकांनीही १० लाख रुपये खर्चापर्यंतची कामे सुचविण्याचे आवाहन केले होते. त्यांचा समावेश करून अंतिम अर्थसंकल्प स्थायी समितीपुढे सादर करण्याची तयारी प्रशासनाने केली आहे.



### अधिकाऱ्यांसमवेत आयुक्तांची बैठक

» महापालिका अर्थसंकल्पाबाबत आयुक्तांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांची नुकतीच बैठक झाली. त्यात अर्थसंकल्प तयार करताना आर्थिक परिस्थिती, पारदर्शकता आणि परिणामकारकता यांना प्राधान्य देण्यात येईल. विविध विभागांनी नागरिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन नियोजन करावे. नागरी केंद्रित विकास हा महापालिकेच्या कामकाजाचा केंद्रबिंदू राहील. त्यादृष्टीने सर्व विकासकामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जाईल, असे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.

### अर्थसंकल्पाबाबत पुढील प्रवास

- » स्थायी समिती सदस्यांची २० फेब्रुवारी रोजी सर्वसाधारण सभेत निवड होईल
- » सदस्य निवडीनंतर अध्यक्षपदासाठी निवडणूक होईल
- » अध्यक्ष निवडीनंतर महापालिका आयुक्त व मुख्य लेखाधिकारी स्थायी समितीपुढे अर्थसंकल्प सादर करतील
- » स्थायी समितीत चर्चा होऊन सदस्य हरकती व सूचना मांडतील, त्यानंतर मंजुरी देतील
- » स्थायी समितीच्या मंजुरीनंतर अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी ठेवला जाईल
- » सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन नगरसदस्य हरकती व सूचना मांडतील
- » नगरसदस्यांच्या उपयुक्त सूचनांचा समावेश करून अर्थसंकल्पाला अंतिम मंजुरी मिळेल
- » अर्थसंकल्प प्रवासाचे सर्व सोपस्कर २० मार्चपूर्वी पूर्ण होणे आवश्यक
- » एक एप्रिलपासून अर्थसंकल्पाची अंमलबजावणी सुरू होईल

# पिंपरी चिंचवड शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

## 17 फेब्रुवारीपर्यंत आदेश लागू ; शांतता व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांचे प्रतिबंधात्मक पाऊल

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी काळात साजरे होणारे सण, उत्सव, क्रांतिवीर लहुजी साळवे पुण्यतिथी व वासुदेव बळवंत फडके पुण्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१)(३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. हे आदेश १७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहतील




या आदेशान्वये कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ, ज्वलनशील द्रव पदार्थ बाळगणे, दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे, सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने तसेच काचेचे तुकडे व काचेच्या रिकाम्या बाटल्या बरोबर नेणे, जमा करणे व तयार करणे, शस्त्रे, सोटे, भाले, चाकु, सुरा, कोयता, तलवारी, दंड, काठया, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणत्याही इसमाचे चित्राचे, प्रतिकात्मक प्रेताचे, पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे, मोठमोठयाने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किंवा आविर्भाव करणे, कोणतेही जिन्नस तयार करून त्याचा जनतेत प्रसार करणे या कृत्यावर बंदी घालण्यात आली आहे.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ च्या कलम ३७ चे पोटकलम (३) प्रमाणे पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणेस किंवा मिरवणूक काढण्यास बंदी मनाई राहील. वरील आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे त्यांना लागू होणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ चे कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र होईल, असे पिंपरी चिंचवड पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांनी कळविले आहे.

# चिखली परिसरात दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## आर्थिक वर्षात शहराला नवीन प्रकल्प काय मिळणार? नगरसदस्य काय कामे सुचवितात? याकडे लक्ष लागले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**


चिखली आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गढूळ आणि दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळणाऱ्या माहितीनुसार, चिखली गावठाण, रामदासनगर, पाटील नगर आणि सोनवणे वस्ती या भागांत चक्क हिरवट आणि पिवळसर रंगाचे पाणी नळावाटे येत आहे. हे दूषित पाणी प्यायल्यामुळे अनेक नागरिकांना उलट्या, जुलाब आणि तीव्र पोटदुखीचा त्रास जाणवू लागला असून, साधारण ३५ ते ४० नागरिकांना खासगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागले आहेत. काहींची प्रकृती खालावल्याने त्यांना अतिदक्षता विभागातही दाखल करावे लागल्याचे समोर आले आहे.



**"प्रभाग क्रमांक १ मधील चिखली परिसरात अनेक दिवसांपासून नागरिक दूषित पाण्यामुळे आजारी पडत आहेत. आम्ही प्रशासनाला पत्र देऊन सर्व पाईपलाईन्सची तातडीने तपासणी करण्याची विनंती केली आहे. नागरिकांच्या जिवाशी खेळ न करता महापालिकेने लवकरात लवकर स्वच्छ आणि शुद्ध पाणीपुरवठा सुरू करावा, ही आमची ठाम मागणी आहे."**
**- यश (काका) साने, नगरसेवक**

या गंभीर समस्येची दखल घेत स्थानिक नागरिकांनी आणि लोकप्रतिनिधींनी महापालिकेकडे धाव घेतली आहे. परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी आधीच होत्या, त्यात आता या विषारी आणि दूषित पाण्यामुळे आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. सर्व पाईपलाईनची तातडीने तपासणी करून गळती शोधण्याची मागणी जोर धरत आहे.

**चिखली परिसरातील पाणीपुरवठ्याच्या तक्रारींची दखल घेण्यात आली असून प्रत्यक्ष पाहणी केली असता पाण्यात काही प्रमाणात बदल दिसून आला आहे. संबंधित पाण्याच्या नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी केली जात आहे. हा अहवाल हाती येताच नेमके प्रदूषण कुठून होत आहे, हे स्पष्ट होईल आणि तातडीने दुरुस्तीची कामे हाती घेऊन शुद्ध पाण्याचा पुरवठा सुरळीत केला जाईल.**
**- स्वाती गिरी, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग**



कु. यश दत्ता (काका) साने
नगरसेवक पि.चि.मनपा
संपर्क : 9822199599 8381099699
जी.एम.सी. राज पॅलेस, आकुर्डी-चिखली रोड, साने चौक, चिखली, पुणे - ६२

दिनांक: 13-02-26

प्रति,
मा.कार्यकारी अभियंता
पाणीपुरवठा विभाग,
पिंपरी. चिंचवड. महानगरपालिका

विषय : कमी दाब व दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत...

महोदय,
वरील विषयास अनुसरून विनंती अर्ज करतो कि, प्रभाग क्र.१ चिखली मधील सर्व परिसरामधील नागरिकांना जो पाणी पुरवठा होतो मूल्यमापना प्रमाणे पाणीपुरवठा होत नसल्यामुळे व त्यात दुषित पाण्याचा प्रादुर्भाव असल्या कारणास्तव नागरिकांची आरोग्य खालावत आहे. व कमी प्रमाणात पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. तरी सर्व पाईप लाईनची तपासणी करून संपूर्ण पाण्याचा आरोग्यदायी योग्य चौकशी करून पाणीपुरवठा सुरळीत करावा. व सर्व पाईप लाईन दुरुस्त करण्यात यावी हि आपणास नम्र विनंती,

आपला विश्वासू,
कु.यश दत्ता (काका) साने
नगरसेवक पिं.चिं.मनपा

पाणीपुरवठा विभाग
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

---

# दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्याबाबत अर्ज स्वीकारण्यास सुरुवात

## दुचाकींसाठी 'NC' मालिकेची सुरुवात; आकर्षक क्रमांकांसाठी 17-18 फेब्रुवारीला अर्ज व लिलाव प्रक्रिया

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड, पुणे येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन NC मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्यासाठी तसेच उर्वरित क्रमांकांसाठी दुचाकी वाहनांबाबत आगाऊ अर्ज स्वीकारून लिलाव पद्धती राबविण्यात येणार आहे.




दुचाकी वाहनांच्या नव्या मालिकेची सुरुवात लवकरच करण्यात येणार असून, वाहनधारकांना आकर्षक व पसंतीचे क्रमांक उपलब्ध करून देण्यासाठी ही कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्यास इच्छुक वाहनमालकांनी दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.३० या वेळेत विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत.

उर्वरित आकर्षक नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी इच्छुकांनी दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.३० या वेळेत अर्ज करावेत. संबंधित अर्ज नव्या वाहन नोंदणी विभागात सादर करावेत. अर्जासोबत ओळखपत्र, पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, पॅनकार्ड इत्यादी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

दुचाकी वाहनांच्या नव्या मालिकेची सुरुवात लवकरच करण्यात येणार असून, वाहनधारकांना आकर्षक व पसंतीचे क्रमांक उपलब्ध करून देण्यासाठी ही कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. अर्जदारांनी विहित शुल्कासह अर्ज सादर करावा. प्राप्त अर्जांवर नियमानुसार कार्यवाही करून आवश्यक असल्यास लिलाव पद्धतीने क्रमांक निश्चित करण्यात येईल. याबाबत अधिक माहितीसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड, पुणे येथे संपर्क साधावा, अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड यांनी दिली आहे.

# तळेगावात मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी 'अभय योजना'

## दोन टक्के दंडात्मक व्याजावर शंभर टक्के सूट देण्याचा प्रस्ताव




**पिंपरी | प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दीतील मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी शासनाच्या 'अभय योजने'ची अंमलबजावणी चालू आर्थिक वर्षात करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत १९ मे २०२५ अखेर थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांवर आकारण्यात आलेल्या दोन टक्के दंडात्मक व्याजावर शंभर टक्के सूट देण्याचा प्रस्ताव नगर परिषदेने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला आहे.

सन २०२५-२६ अखेरपर्यंत मालमत्ता कराचा भरणा करताना मागील वर्षांच्या थकबाकीवरील दंडात्मक व्याज माफ करून केवळ मूळ कराची रक्कम भरण्याची संधी नागरिकांना उपलब्ध होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त थकबाकीदारांनी या योजनेचा लाभ घेऊन त्वरित कर भरणा करावा, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाने केले आहे.

मुख्याधिकारी गिरीश दापकेकर, उपमुख्याधिकारी ममता राठोड आणि कर अधिकारी कल्याणी लाडे यांच्या मार्गदर्शनाखाली कर वसुली मोहीम वेगाने सुरू आहे. यंदा ३८ कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यापैकी १२ कोटी ४५ लाख रुपयांची वसुली झाली आहे. उर्वरित थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.


# पुण्यात अतिक्रमण विरोधी कारवाईचा धडाका; शहरभर संयुक्त कारवाई

## शहर अतिक्रमणमुक्त करण्याच्या दिशेने महापालिकेने कडक धोरण राबविले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाकडून शहरभर जोरदार कारवाई सुरू असून, आयुक्त नवल किशोर राम यांच्या आदेशानुसार उपायुक्त सोमनाथ बनकर यांच्या नेतृत्वाखाली कारवाईचा धडाका लावण्यात आला आहे. विविध विभागांच्या संयुक्त पथकांमार्फत सुरू असलेल्या या मोहिमेमुळे शहर अतिक्रमणमुक्त करण्याच्या दिशेने महापालिकेने कडक धोरण राबविले आहे.

महापालिकेने गुरुवारी (दि. १२) शहरातील विविध भागांमध्ये अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, तसेच आरक्षित जागेवरील अतिक्रमणांवर कारवाई केली. विशेषतः सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय हद्दीत पाणीपुरवठा विभागाच्या जागेवर झालेल्या अनधिकृत बांधकामावर मोठी कारवाई करण्यात आली. वडगाव बुद्रुक येथील सर्व्हे नंबर ४३ मधील वॉटर ट्रीटमेंट प्लांट (WTP) साठी आरक्षित जागेवरील अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. या कारवाईत ५० हजार २४३ चौरस फूट क्षेत्रफळावरील बांधकामावर कारवाई करण्यात आल्याचे संयुक्त अहवालात नमूद करण्यात आले आहे.



### ५० हजार चौरस फूट अनधिकृत बांधकामांवर कारवाई

» पुणे महापालिकेच्या अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाकडून शहरभर व्यापक कारवाई सुरू करण्यात आली आहे. आयुक्त नवल किशोर राम यांच्या आदेशानुसार उपायुक्त सोमनाथ बनकर यांच्या नेतृत्वाखाली विविध विभागांच्या संयुक्त पथकांनी गुरुवारी (दि. १२) अनेक भागांत धडक कारवाई केली. सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत वडगाव बुद्रुक येथील सर्व्हे क्रमांक ४३ मधील वॉटर ट्रीटमेंट प्लांट (WTP) साठी आरक्षित जागेवरील अतिक्रमण हटविण्यात आले. सुमारे ५० हजार २४३ चौरस फूट क्षेत्रफळावरील अनधिकृत बांधकामांवर हातोडा चालविण्यात आल्याची माहिती संयुक्त अहवालात देण्यात आली.

ही कारवाई पाणीपुरवठा विभाग, अतिक्रमण निर्मूलन विभाग, सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय, मालमत्ता व्यवस्थापन विभाग आणि बांधकाम विभाग यांच्या संयुक्त पथकाने केली. आरक्षित जागा मोकळी करून भविष्यातील पाणीपुरवठा प्रकल्पांना अडथळा येऊ नये, हा या कारवाईमागील प्रमुख उद्देश असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

दरम्यान, भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत खडक पोलीस वाहतूक विभागाच्या मदतीने कारवाई करण्यात येत असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले. वानवडी-रामटेकडी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतही अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेडवर कारवाई करण्यात आली. नगर रोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आदर्श नगर, लोहगाव येथे बांधकाम विकास विभागासोबत संयुक्तपणे अनधिकृत बांधकाम निर्मूलनाची कारवाई सुरू असल्याची माहिती देण्यात आली.

या कारवाईमुळे महापालिकेच्या भूमिकेचे स्वागत होत असले तरी, एकीकडे शहरात आता प्रशासक राज संपून निवडून आलेले नगरसेवक कार्यरत झाले आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधींच्या भूमिकेकडेही लक्ष वेधले जात आहे. अतिक्रमण हटविताना नागरिकांच्या दबावाला नगरसेवक कितपत सामोरे जातील, तसेच शहराच्या हितासाठी ते किती ठाम भूमिका घेतील, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी कडक धोरण

» भवानी पेठ, वानवडी-रामटेकडी तसेच नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतही अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेडवर कारवाई करण्यात आली. आदर्श नगर, लोहगाव येथे बांधकाम विकास विभागासोबत संयुक्त मोहिम राबविण्यात येत आहे. शहरातील आरक्षित जागा, सार्वजनिक सुविधा, रस्ते आणि वाहतूक व्यवस्थेवर अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटविण्यास प्राधान्य दिले जात आहे.

> शहरात अतिक्रमण विरोधी कारवाई कडक करण्यात आली आहे. ज्यांनी अतिक्रमण केले असेल त्यांनी तर काढून घ्यावे, नोटीस दिल्यानंतर कोणाचेही नुकसान होऊ नये म्हणून त्यांचे साहित्य काढून घेण्यास सांगितले जाते. परंतु त्यानंतरही ते तसेच दिसून येत असल्याने तर काढून टाकण्याचे काम विभागाकडून केले जात आहे. शहरात अतिक्रमण विरोधी तसेच बेकायदा बांधकाम विरोधी कारवाई सुरूच राहणार आहे.
>
> - सोमनाथ बनकर, उपायुक्त, अतिक्रमण निर्मुलन आणि बेकायदा बांधकाम निर्मूलन विभाग.

# मेट्रोतून प्रवास करणे आता आणखी सोपे, रांगेत उभे राहण्याचे टेन्शन मिटले

## पुणे मेट्रोमध्ये रुपे ऑन-द-गो (ओटीजी) कार्ड स्वीकारण्याची सुविधा सुरू केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय) महामेट्रो आणि पुणे मेट्रोसाठी विशेष ॲक्वायरर बँक असलेल्या एचडीएफसी बँकेसोबत सहयोगाने पुणे मेट्रोमध्ये रुपे ऑन-द-गो (ओटीजी) कार्ड स्वीकारण्याची सुविधा सुरू केली आहे. यामुळे प्रवासी त्यांच्या रुपे ऑन-द-गो कार्डचा वापर करून पुणे मेट्रोतून प्रवास करू शकतात. संपर्करहित आणि इंटरऑपरेबल पेमेंट सोल्यूशन्सद्वारे ही डिजिटल तिकीट यंत्रणा विनासायास आणि सुलभ अनुभव देते.




कागदी तिकीट, मोबाइल क्यूआर तिकीट, तसेच एचडीएफसी बँक वन पुणे एनसीएमसी रुपे कार्डद्वारे प्रवाशांना सुविधा देणारी पुणे मेट्रो आता ओपन-लूप रुपे ऑन-द-गो स्वीकारण्याच्या सुविधेमुळे अधिक सुधारित प्रवास अनुभव प्रवाशांना देणार आहे. या उपक्रमामुळे कोणतेही विद्यमान किंवा नवीन रुपे ऑन-द-गो कार्ड वापरून मेट्रोच्या सर्व २९ कार्यरत स्थानकांवर 'टॅप अँड ट्रॅव्हल' करता येणार आहे.

दैनंदिन प्रवाशांना यामुळे सोयीस्कर आणि विनासायास प्रवासाची सुविधा देणार आहे. यामुळे कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी आणि प्रवासी संपूर्ण नेटवर्कमध्ये एकाच कार्डचा वापर करू शकतील. प्रत्येक प्रवासासाठी किंवा वेगवेगळ्या मेट्रो मार्गिकांसाठी स्वतंत्र तिकीट खरेदी करण्याची गरज न राहिल्याने प्रवास अधिक सोपा होईल. रुपे ऑन-द-गो कार्ड विविध बस आणि मेट्रो सेवांमध्ये इंटरऑपरेबिलिटीला पाठबळ देते, तसेच ऑफलाइन पेमेंटची सुविधाही प्रदान करतेय यामुळे कमी नेटवर्क असलेल्या भागांमध्येही प्रवाशांना कोणताही अडथळा येणार नाही.

### डिजिटल पेमेंटला गती

» एनपीसीआयच्या कार्यकारी संचालिका सोहिनी राजोला म्हणाल्या की, पुणे मेट्रोमध्ये 'रुपे ऑन-द-गो' सुरू करणे हे देशातील शहरी गतिशीलता सुधारण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. पुणेकरांचा प्रवास अधिक सुखकर करण्यासाठी काम करताना आम्हाला आनंद होत आहे. याद्वारे आम्ही डिजिटल पेमेंटची व्याप्ती वाढवून त्याला सर्वसामान्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवत आहोत.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक

## पुणे जिल्ह्यातील सुरू केलेले प्रकल्प दर्जेदार पद्धतीने आणि वेळेत पूर्ण करण्याची सर्वांची जबाबदारी- उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ साठी रुपये १ हजार ३७९ कोटी मंजूर नियतव्यय असून सर्व निधी वेळेत खर्च होईल याची दक्षता सर्व संबंधित यंत्रणांनी घ्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घालून दिलेल्या शिस्तीच्या, गुणवत्तेच्या आणि कालमर्यादेत काम पूर्ण करण्याच्या मार्गावरच जिल्ह्यातील सुरू केलेले प्रकल्प दर्जेदार पद्धतीने आणि वेळेत पूर्ण करण्याची सर्वांची जबाबदारी आहे, त्यादृष्टीने वाटचाल करुया, असे आवाहन त्यांनी केले.

पुणे जिल्हा नियोजन समितीची ही बैठक सन २०२५-२६ मधील जानेवारी २०२६ अखेर झालेल्या खर्चाचा आढावा घेऊन सन २०२६-२७ च्या प्रारूप आराखड्याला मान्यता देण्यासाठी विधानभवन येथे आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत त्यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे मार्गदर्शन केले.



### १,३७९ कोटींची जिल्हा वार्षिक योजना; निधी वेळेत खर्च करण्याचे निर्देश

» पुणे जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ साठी १ हजार ३७९ कोटी रुपयांचा मंजूर नियतव्यय असून हा निधी वेळेत आणि प्रभावीपणे खर्च होईल याची दक्षता सर्व संबंधित विभागांनी घ्यावी, असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिले. जिल्ह्यात सुरू असलेले प्रकल्प गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि ठरलेल्या कालमर्यादेत पूर्ण करण्याची जबाबदारी सर्व यंत्रणांची असल्याचे त्यांनी नमूद केले. निधी खर्चात कोणतीही दिरंगाई होऊ नये, यासाठी नियमित आढावा घेण्यावर भर देण्यात आला.

यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार अमित गोरखे, भीमराव तापकीर, राहुल कुल,सिद्धार्थ शिरोळे, बापूसाहेब पठारे, बाबाजी काळे, शंकर मांडेकर, हेमंत रासणे, सुनील शेळके,शंकर जगताप, पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी-चिंचवड मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश म्हसे, पुणे मनपा अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पिंपरी-चिंचवडचे पोलीस सह आयुक्त शशिकांत महावरकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता राजेंद्र राहणे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे, पालक सचिव व्ही. राधा, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे शहरचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

### प्रकल्पांना प्राधान्य; दुर्गम भागांवर विशेष लक्ष

» जिल्हा नियोजन समितीमार्फत लहान तुकड्यांतील कामांऐवजी अधिकाधिक नागरिकांना थेट लाभ देणारे मोठे आणि दीर्घकालीन परिणाम करणारे प्रकल्प राबविण्याचे धोरण अवलंबावे, असे निर्देश देण्यात आले. विशेषतः अतिमागास व दुर्गम भागांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन करण्यात आले. प्रशासकीय मान्यता, निविदा प्रक्रिया आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यासाठी स्पष्ट कालमर्यादा निश्चित करून कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. लोकप्रतिनिधींनी त्यांच्या मतदारसंघातील प्राधान्यक्रमांची यादी त्वरित सादर करावी, असेही सांगण्यात आले.

### २०२६-२७ साठी १,०३२.८८ कोटींची मर्यादा

» सन २०२६-२७ साठी शासनाने १ हजार ३२.८८ कोटी रुपयांची वित्तीय मर्यादा निश्चित केली आहे. मात्र विविध विभागांकडून एकूण ३ हजार १२८ कोटी रुपयांची मागणी प्राप्त झाली आहे. त्याची छाननी करून सुमारे ७०० कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी शासनाकडे प्रस्तावित करण्यात येणार आहे. बैठकीत जानेवारी २०२६ अखेर झालेल्या खर्चाचा आढावाही घेण्यात आला असून पुढील आर्थिक वर्षासाठी प्रस्तावित आराखड्याला मान्यता देण्यात आली.

---

# पुणे महापालिकेच्या हद्दीत 23 गावांचा समावेश ; 'विशेष नियोजन प्राधिकरण' रद्द

## शहराच्या विस्तार आणि नियोजनाच्या दृष्टीने हा निर्णय ऐतिहासिक मानला जात आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या हद्दवाढीचा बहुप्रतिक्षित निर्णय अखेर राज्य शासनाने जाहीर केला असून शहराच्या विस्तार आणि नियोजनाच्या दृष्टीने हा निर्णय ऐतिहासिक मानला जात आहे. नगरविकास विभागाने ११ फेब्रुवारी २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करून पुणे महापालिकेच्या हद्दीत २३ गावांचा अधिकृत समावेश केला आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि मंत्रालय स्तरावरील ठोस पुढाकारामुळे हा निर्णय शक्य झाल्याचे सांगण्यात येत आहे.




राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २३ गावांसाठी पूर्वी नियुक्त केलेले 'विशेष नियोजन प्राधिकरण' रद्द करण्यात आले आहे. यापुढे या सर्व गावांसाठी पुणे महापालिका हेच नियोजन प्राधिकरण म्हणून कार्य करणार आहे. त्यामुळे विकास आराखडा मंजुरी, बांधकाम परवानग्या, पायाभूत सुविधा उभारणी तसेच नागरी सेवा या सर्व बाबींमध्ये एकसंध आणि सुसूत्र नियोजनाला गती मिळणार आहे. गेल्या काही वर्षांपासून हद्दवाढीबाबत सुरू असलेल्या चर्चेला आता अधिकृत शिक्का बसल्याने संबंधित गावांतील नागरिकांसह शहरातील प्रशासकीय यंत्रणेलाही स्पष्ट दिशा मिळाली आहे.

या निर्णयांतर्गत म्हाळुंगे, सुस, बावधन (बु), किरकटवाडी, पिसोळी, कोंढवे-धावडे, कोपरे, नांदेड, खडकवासला, मांजरी बुद्रुक, नऱ्हे, होळकरवाडी, औताडे-हांडेवाडी, वडाचीवाडी, शेवाळेवाडी, नांदोशी, सनसनगर, मांगेवाडी, भिलारेवाडी, गुजर निंबाळकरवाडी, जांभुळवाडी, कोळेवाडी आणि वाघोली या गावांचा समावेश करण्यात आला आहे. पुणे शहराच्या आजूबाजूला झपाट्याने नागरीकरण होत असलेल्या या परिसरांचा विकास अनेकदा विस्कळीत पद्धतीने होत असल्याची टीका होती. आता महापालिकेच्या थेट नियंत्रणाखाली या भागांचा नियोजनबद्ध विकास होईल, असा दावा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

### २३ गावांचा महापालिकेत समावेश; अधिसूचना जाहीर

» राज्य शासनाने ११ फेब्रुवारी २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करून पुणे महापालिकेच्या हद्दीत २३ गावांचा अधिकृत समावेश केला. शहराच्या वाढत्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय ऐतिहासिक मानला जात आहे. नगरविकास विभागाच्या या निर्णयामुळे हद्दवाढीबाबत सुरू असलेल्या चर्चेला अधिकृत शिक्का बसला आहे.